माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

## अपील क्रमांक : १९४५/२०१८

**अपीलकर्ता** श्री. विलास किसन नंदुरकर,
मु. जांभळी, पो.ता. साकोली
जि. भंडारा-४४१८०२.

**जन माहिती अधिकारी तथा सहसचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती,
लाखनी जि. भंडारा-४४१८०४

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती,
लाखनी जि. भंडारा-४४१८०४

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०८.२०१८**

**अपीलकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०३.२०१८ | ०५.०४.२०१८ | १२.०४.२०१८ | ०९.०५.२०१८ |

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक १९.०३.२०१८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जान्वये त्यांनी " समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या मुख्य यार्डात व उपबाजार येथील आवारात तसेच मुख्य यार्ड व उपबाजार सोडुन इतर ठिकाणावरुन कोण कोणत्या व्यापाऱ्याकडुन किती शेष जमा/वसुल करण्यात आला, त्याची यादी, पत्ता व वसुल करण्यात आलेल्या शेष रक्कम बद्दल माहिती " मागितलेली आहे.

अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिनांक २६.०६.२०१८ रोजीच्या अर्जान्वये " माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने आज दिनांक ०७.०८.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

माहिती अधिकारी तथा सहसचिव श्री. स्वप्नील हुकाराम गायधनी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव, श्री. संजय गजानन पारोदे उपस्थित आहेत.

द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही. कोर्टात प्रकरण असल्याचे खोटी कारणे सांगून माहिती पुरवित नाही. त्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले, दाखल प्रकरण कामगार न्यायालय भंडारा येथे न्यायप्रविष्ट असून मागितलेली माहिती प्रकरणाचा पुराव्याचा भाग असल्याने देता येवू शकत नाही, असे अर्जदारास कळविण्यात आलेले होते. तसेच कलम २(च) नुसार माहिती देण्यात आल्याने अपील अर्ज खारीज करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात व्यापाराकडून जमा महसूल, यादी, शेष रक्कम इत्यादी माहिती मागितलेली आहे. उपरोक्त माहितीचा न्यायप्रविष्ठ प्रकरणाचा कोणताही संबंध दिसून येत नाही. रहीवाशी पत्ते वैयक्तीक माहिती असल्याने असे पत्ते वगळता संपूर्ण माहिती देय ठरते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अर्जात नमुद देय असलेली माहिती अर्जदारास विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवून त्याची प्रत आयोगास सादर करावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अतः आयागाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत

**आदेश**

उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(दिलीप ध. धारुरकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

**नागपूर**
**दिनांक ०७.०८.२०१८**

जा.क्र. 9487 दि. 15 OCT 2018